C.S.(M)2013

A–BRL–M–NBSC

# MARATHI
(Compulsory)

*Time Allowed : Three Hours*

*Maximum Marks : 300*

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions.**

All questions are to be attempted.

The number of marks carried by a question is indicated against it.

Answers must be written in **Marathi** unless otherwise directed in the question

Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.

Any page or portion of the page left blank in the answer book must be clearly struck off.

---

**Q.1. खाली दिलेल्या विषयांवर 300 शब्दांच्या सीमेत निबंध लिहा :—** **50×2=100**

Q. 1(अ) आपल्या जगण्यात आयुष्याची वर्षे महत्त्वाची नसून कर्म महत्त्वाचे आहे. 50

Q. 1(ब) वेळेत न्याय मिळाला नाही तर कोणताही समाज प्रगती करू शकणार नाही. 50

**Q.2. पुढील उतारा काळजीपूर्वक वाचून खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. उत्तरे संक्षिप्त, सुस्पष्ट व बरोबर असावीत :—** **6×10=60**

पत्रकारांमध्ये असलेले मतभेद प्रशासनातील लोकांच्या दृष्टीने सोयीचे झाले आहे. अशा प्रकारच्या मतमतांतरांमुळे वर्तमानपत्रांची शक्तीही सौम्य झाली आहे. वर्तमानपत्रांचा सूर प्रखर असून तो सर्वसाधारण लोकांपर्यंत पोचायला हवा, पण तसे होत नाही.

वर्तमानपत्रांचे यश कशात आहे ते सांगणे कठीण असून आर्थिक दृष्ट्या खूपविके वर्तमानपत्र किंवा सर्वात जास्त खप असलेले वर्तमानपत्र यापैकी कोणत्याही प्रकारे त्यांचे सामर्थ्य किंवा यश ठरविता येत नाहीं.

वर्तमानपत्राचा प्रसार हा खरे तर वाचकांचा प्रतिसाद असतो. समाजातला पोकळपणा आणि दुर्बलता दूर व्हावी या आशयाने वाचक वर्तमानपत्राकडे वळतो. सिनेमातल्या 'बॉक्स ऑफिस अपील'शी त्याचे साधर्म्य आहे.

सिनेमाच्या आकर्षणाचे बळ त्यात दाखविण्यात येणाऱ्या पात्रांमध्ये असते. सिनेमाचे व्यावसायिक यश हे त्यातील कलामूल्यापेक्षा वेगळे असते. कलेचे योग्य ते मूल्यमापन करणे हे गर्दीला शक्य नसते. कलेचे वास्तव व योग्य मूल्यमापन करण्याची सिद्धता तुलनेने कमी लोकांत असते. जात्याच कलेचे मूल्यमापन करण्याची क्षमता असणाऱ्यांमध्ये आणि मनोरंजनाची भूमिका असलेल्या अशिक्षितांमध्ये नेहमीच तफावत असते. अशिक्षितांच्या गुणवत्तेत्त सुधारणा करणे हे वर्तमानपत्रांचे आणि सिनेमाचे शैक्षणिक धोरण असते/असावे. त्या संबंधीचे प्रयत्न वर्तमानपत्रे आणि सिनेमा यांच्यात सारखेच आहेत. आणि त्याविषयीची भावनाही दोघांत सारखीच आहे.

प्रश्न :

Q.2 (i) लेखकाने कोणत्या दोन गोष्टींची तुलना केली आहे ? 10

Q.2 (ii) लोक कोणत्या भूमिकेतून वर्तमानपत्रांना प्रतिसाद देतात ? 10

Q.2 (iii) लेखकाला कोणत्या प्रकारची सिद्धता अपेक्षित आहे ? 10

Q.2 (iv) लेखकाच्या मते वर्तमानपत्रांचे काय ध्येय असावे ? 10

Q.2 (v) लेखक कोणत्या लोकांशी सहमत नाही ? 10

Q.2 (vi) कोणत्या धोरणांवरून वर्तमानपत्राची गुणवत्ता किंवा सामर्थ्य ठरविता येत नाही ? 10

**Q.3. पुढील उताऱ्याचे अंदाजे एक तिहाइ शब्द संख्या में सारांश लिहा. उताऱ्याला शीर्षक देणे आवश्यक नाही. सारांश शब्दसंख्येच्या मर्यादेत नसेल तर तुमचे गुण कमी केले जातील :— 60**

आजच्या युगात 'राष्ट्र' आणि 'राष्ट्र-राज्य' या संकल्पनांच्या बाबतीत फारच गोंधळ असल्याचे दिसून येते. 'राष्ट्र-राज्य' हे जागतिक राजकीय संघटनांचे महत्त्वाचे घटक असून त्यांना परिभाषित करणे सोपे आहे. 'राष्ट्र-राज्य' ही संकल्पना सार्वभौम देश या संकल्पनेशी तंतोतंत जुळणारी असून यांना संयुक्त राष्ट्र सभेत प्रतिनिधित्त्वही आहे. इंग्रजीत त्यांना देश असे म्हटले जाते. खरं तर त्यांना 'राज्य' म्हणणे तसे सोपे आहे, परंतु दुर्दैवाने काही राष्ट्र-राज्यांत त्यांना त्यांच्या तुलनेत एक लहान घटक मानले जाते.

'राष्ट्र-राज्य' आणि सार्वभौम राज्य यांच्यात तुलना करून पाहण्याचा मोह हा स्वाभाविकच आहे. परन्तु आधुनिक काळात सार्वभौमतेचे प्रवाही स्वरूप लक्षात घेता तसे करणे चकवणारे ठरू शकते. वास्तविक पाहता सर्वच राष्ट्र-राज्यांनी त्यांची सार्वभौमिकता काही अंशी अंतरराष्ट्रीय संघटनांच्या स्वाधीन केलेली आहेच. संयुक्त राष्ट्र सभा याचे एक उदाहरण म्हणून दाखविता येईल. देशांच्या परस्पर व्यवहारात करार आणि संबंध यांची रचना गुंतागुंतीची आहे. याचे एक टोक म्हणजे यात काही मोठ्या राष्ट्रांना अधिकार मिळतात, तर दुसरे टोक म्हणजे अनेक लहान राष्ट्रे ही शक्तिशाली शेजाऱ्याच्या संरक्षणाखाली असल्यामुळे त्यांना खरोखर अनेक क्षेत्रांत स्वतंत्र निर्णय घेता येत नाही. बहुतांशी राष्ट्र-राज्ये ही स्वत:ला 'राष्ट्र' असे म्हणत असतात त्यामुळे आपणही राष्ट्र-राज्य आणि राष्ट्र हे एकच आहे असे का म्हणू नये ? पण तसे शक्य नाही. कारण राष्ट्र-राज्य ही व्यवस्था कायद्याच्या दृष्टीने मान्य आहे ; तर राष्ट्र म्हणजे प्रजा किंवा लोक. आधुनिक प्रजा किंवा लोक स्वत:ला राष्ट्र म्हणवितात आणि त्यांना स्वत:ला राष्ट्र-राज्याचा दर्जा प्राप्त करण्याची इच्छा आहे. राष्ट्र-राज्याच्या दर्जा

हा राष्ट्राच्या वरचढ अशी त्याची व्याख्या करणे संकुचितपणाचे ठरेल. सर्वच भाष्यकार हे म्हणणे स्वीकारतील की पूर्वीच्या सोवियत संघातील बहुसंख्य लोक म्हणजे जॉर्जियन्स, लिथुएनिअन्स, आणि युक्रेनिअन्स ही संघराज्ये स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी राष्ट्रेच होती. त्याच प्रमाणे स्कॉटलँड सारख्या स्पष्टपणे परिभाषित केलेल्या प्रदेशाला देखील राष्ट्र-राज्य म्हणायला हवे. थोडं वेगळ्या पद्धतीने सांगायचे झाले तर स्वायत्तता किंवा स्वातंत्र्याची महत्त्वाकांक्षा ही पुरेशी आहे. राष्ट्र-राज्य या आधुनिक संकल्पनेशी वरवरचे साधर्म्य असले तरी राज्यकारभाराच्या काही पद्धती जुन्याच आहेत. काही शतकांपूर्वीच्या काही भागांचा विचार केला तर, उदाहरणार्थ : चायना, भारत आणि मेडिटेरेनियन्स ह्या फार प्राचीन पण मुळात मुलूख असलेल्या भागांवर पांढरपेशा लोकांचे नियंत्रण होते. या सुरुवातीच्या राज्यकारभाराच्या पद्धतींचा विकास होऊन किंवा ह्या ऐवजी राष्ट्र-राज्य हे अस्तित्वात आले. ही प्रक्रिया संथगतीने झाली त्यामुळे जुन्या पद्धतीचे अवशेष आधुनिक काळातही अस्तित्वात होते. ऑस्ट्रो-हंगेरियन, रशियन आणि तुर्कस्तान साम्राज्य जे 1917-1918 पर्यंत अस्तित्त्वात होते आणि तिथे घराणेशाहीचे साम्राज्य होते. परन्तु तेथील प्रजेच्या मनात राष्ट्रीय अस्मितेची जराही जाणीव नव्हती. उलट रशिया जिथे खऱ्या अर्थाने 1991 पर्यंत साम्राज्यवादी परंपरा होती तिथे मात्र अनेक राष्ट्रे एकत्रपणे अस्तित्त्वात होती. आजही अशी अनेक उदाहरणे देता येतील जिथे राष्ट्र-राज्य आणि राष्ट्र ही एकमेकांशी सहजपण न जुळणारी आहेत. राष्ट्र-राज्यातील शासक जरी स्वतःच्या राज्यकारभाराला राष्ट्र म्हणून प्रचार-प्रसार करीत असले तरी अनेक राज्यातील लोक याला राष्ट्रीय अस्मिता म्हणून स्वीकारणार नाहीत. ब्रिटेन मधील अनेक स्कॉट आणि वेल्स लोक स्वतःला ब्रिटिश नेशन समजण्यापेक्षा स्कॉट किंवा वेल्स मानतात. फार तर स्कॉटिश-ब्रिटिश किंवा वेल्स-ब्रिटिश. अरब राष्ट्रांमध्ये अनेकजण स्वतःला त्या त्या राष्ट्राचे नागरिक समजण्याऐवजी स्वतःला अरब राष्ट्राचा भाग मानतात. थेट ईराक ते मोरक्को आणि दक्षिणी यमन पर्यंत.

अनेक लोकांच्या दृष्टीने जाती संबंधीची ओळख ही इतकी तीव्र असते की तिच्यापुढे राष्ट्रीय ओळख ही गौण ठरते. किंवा त्याला काहीच महत्त्व नाही. उदाहरणासाठी आरंभीचे अमेरिकन्स किंवा अफ्रिकन समूहांचा उल्लेख करता येईल.

राष्ट्र-राज्य आणि राष्ट्र हे तंतोतंत जुळणारे नसले तरी ते निश्चितपणे एकमेकांशी संलग्न आहेत. एंथनी स्मिथ (पहा-'स्मिथ-1991') ने सांगितल्या प्रमाणे राष्ट्रांची वर्गवारी या प्रकारे करता येईल. एक तर ज्यांनी स्वतःच्या जातिविषयक अस्मितेतून बाहेर पडून व्यापक जन समूहात स्वतःला सामावून घेतले ते आणि दुसरे एखाद्या विशिष्ट प्रदेशात पूर्वीची वेगवेगळे असल्याची भावनेचा लोप पावून सर्वसाधारणपणे राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उदय होतो. **(449 शब्दांचे)**

**Q.4. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :— 20**

Raman completed school when he was just eleven years old and spent two years studying in his father's college. When he was only thirteen years old, he went to Madras (which is now Chennai) , to join the B.A. course at Presidency College. Besides being young for his class, Raman was also quite unimpressive in appearance and recalls, '.....in the first English class that I attended, Professor E.H. Elliot addressing me, asked if I really belonged

to the junior B.A. class, and I had to answer him in the affirmative'. He, however, stunned all the sceptics when he stood first in the B.A. examinations.

Seeing what a brilliant student he was, his teachers asked him to prepare for the Indian Civil Services (ICS) examination. It was a very prestigious examination and very rarely did non-Britishers get through it. Yet Raman had impressed his teachers so much that they urged him to take it up at such an early age. In spite of their student's brilliance, the plan was not to work. Raman had to undergo a medical examination before he could qualify to take the ICS test and the Civil Surgeon of Madras declared him medically unfit to travel to England ! This was the only examination that Raman failed, and he would later remark in his characteristic style about the man who disqualified him, 'I shall ever be grateful to this man,' but at that time, he simply put the attempt behind him and went on to study Physics.

Q.5. खालील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा :— **20**

खरेदी करण्यासाठी सहजपणे एका हातातून दुसऱ्या हातात जातो तो पैसा अशी पैशाची व्याख्या करता येईल. पूर्वीच्या वस्तु विनिमय पद्धती ज्यात अदल-बदल करण्यात येणाऱ्या वस्तूचे मोल ठरविण्यात येणाऱ्या अडचणी, आणि देवाण-घेवाण करणाऱ्या व्यक्तींची ती वस्तू घेण्याची वा देण्याची इच्छा या सारखे अडथळे येत; ते पैशाच्या व्यवहारातून दूर सारता आले. व्यापक उत्पादकतेसाठी आवश्यक असलेल्या बाबी अर्थात श्रमाची वर्गवारी आणि श्रमकौशल्य पैशाच्या व्यवहारातून ठरविता येते. चलन कोणत्याही प्रकारचे असो, किंवा कायदा आणि परंपरेने मान्य केलेल्या इतर कोणत्याही स्वरूपाचे असो, परंतु ते सहज आणि व्यापक पातळीवर स्वीकार्य असले पाहिजे. आदिम काळात पशू, तांदूळ आणि शिंपले या सारख्या वस्तूंचा वापर केला जात असे. मात्र आधुनिक समाजात सर्वत्र धातु किंवा कागदाचा वापर केला जातो. नाणी किंवा कागदी रुपयात ती सर्व वैशिष्ट्ये आहेत जी पैशात असायला हवी. जसे; टिकाऊपणा, सहज हाताळता येणे, समानता आणि स्वीकार्यता. चलनासाठी मुख्यत्त्वे सोनं, चांदी, तांबं आणि निकलचा वापर केला जातो. चलन वेगवेगळ्या धोरणातून सोडला जातो. विनिमयाच्या माध्यमाच्या व्यतिरिक्त पैशाचे स्वत:चे मूल्य असते. त्यामुळे त्या आधारे थकलेली रक्कम अर्थात कर्ज किंवा ठेवीचे मूल्य ठरविता येते. प्रमाण पैसा आणि प्रतीक पैसा यांच्यातील महत्त्वाचा फरक म्हणजे कोणत्याही वस्तूचे मूल्य ठरविताना त्याची तुलना केली जाते तो प्रमाण पैसा. प्रमाण पैशाचे मूल्य ज्या पदार्थातून तो तयार झाला आहे त्यावर ठरते. उलट प्रतीक पैसा याचे मूल्य कायद्यानुसार किंवा परंपरेने ठरते.

Q. 6(अ) खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा :— **5×2=10**

(i) पदरमोड करणे. 2

(ii) कोंड्याचा मांडा करणे. 2

(iii) हातावर तुरी देणे. 2

(iv) कात्रीत सापडणे. 2

(v) गंगेत घोडे न्हाणे. 2

Q. 6(ब) खाली दिलेल्या कल्पनांचा विस्तार 10 वाक्यात करा :— 2×5=10

(i) सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. 5

(ii) क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे. 5

Q. 6(क) पुढील विषयावर 20 वाक्यांचा संवाद लिहा :— 10

(i) नकारात्मक मतदानाचा अधिकार

Q. 6(ड) खाली दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :— 1×10=10

(i) कडू 1

(ii) अमृत 1

(iii) लाजरा 1

(iv) विश्वसनीय 1

(v) हडकुळा 1

(vi) आकाश 1

(vii) उथळ 1

(viii) वेगवान 1

(ix) भाग्यवान 1

(x) प्रशंसा 1